भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०४/२०१७

**१) मोटार सायकलची मोटार सायकलला आमोरा समोर धडक देवुन दोन्ही स्वत:चे मरणास व पाचही जणांना किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १०/०४/२०१७ चे २१.१५ वा. दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल क्रमांक एमएच ३६/ जे १७१० चा चालक मनिष छगण टिचकुले वय २४ वर्ष, रा. पेंढरी व मोटार सायकल क्र. एमएच १४/ ७२४४ चा चालक धरमदास वडगु बांन्ते यांनी आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन एक दुसऱ्यांचे मोटार सायकलला आमोरा समोर धडक मारली व दोन्ही आरोपी हे स्वत: मृत्यु पावले तसेच त्यांचे दोन्ही मोटार सायकलवर बसलेले १) सौ. इंदीरा छगण टिचकुले, २) सौ. वच्छला अशोक टिचकुले, ३) अश्विन प्रभु टिचकुले वय २२ वर्ष, ४) अथर्व धरमदास बांन्ते वय ५ वर्ष, ५) प्रल्हाद धरमदास बांन्ते यांना गंभिर जखमी व किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सेवकराम भैय्याजी टिचकुले वय ४८ वर्ष, रा. पेंढरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ),३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४/११७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**२) अचानक प्रकृती बिघडल्याने तरुणांचा मृत्यु . :–**

दिनांक ११/०४/२०१७ चे ०८.०० ते १५.०० वा. दर यातील मृतक जयपाल वणवे वय २८ वर्ष, रा. खैरी ता. तिरोडा जि. गोदीया हा मानसिक रोगी असुन घरुन निघुन गेला असता त्याची अचानक प्रकृती बिघडुन मरण पावल्याने फिर्यादी भास्कर जयपाल वय २८ वर्ष, रा. खैरी ता. तिरोडा जि. गोदीया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**३) अचानक रोडवर पडुन डोक्यास मार लागुन गंभिर जखमी होऊन युवकाचा मृत्यु . :–**

दिनांक ११/०४/२०१७ चे १२.३० वा. दर यातील मृतक आंनद रेवाराम गोपाले वय २५ वर्ष, रा. खरबी हा डांबरी रोडचे कामावर डांबर गाडीचे मागे उभे राहुन डांबर स्प्रे करीत असतांना अचानक खाली डांबरी रोडवर पडुन डोक्यास मार लागुन गंभिर जखमी होऊन मरण पावल्याने फिर्यादी विरपाश्या दस्तरगीर शेख वय ४४ वर्ष, रा. आढावा मैल उल्हास नगर नागपुर ह. मु. खरबी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**४) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंदः—**

**अ)** दिनांक ११/०४/०१७ चे १६.०० ते १६.३० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील मिनीडोर ऑटो जुना बस स्थानक जवळ येथील सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ११/०४/०१७ चे १८.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन निलज येथील सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ११/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता